# तंत्र शिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य

तंत्र शिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य,मुंबई मार्फत व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये शिकणा-या विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येत असलेल्या राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना व डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना बाबतची माहिती

**आपले सरकार महाडिबीटी पोर्टल - https://mahadbtmahait.gov.in**

## ➢ राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना :-

उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासनामार्फत मान्यता प्राप्त निवडक व्यावसायिक अभ्यासक्रमात शासनाच्या सक्षम प्राधिकरणामार्फत केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेव्दारे (CAP) प्रवेश घेतलेल्या राज्यातील आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थी ज्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रु. ८.०० लाखापर्यंत आहे अशा पात्र विद्यार्थ्यांना शैक्षणिक व परिक्षा शुल्कांच्या ५० टक्के मर्यादेपर्यंत शिष्यवृत्ती.

**मागील दोन वर्षातील लाभार्थी विद्यार्थ्यांचा तपशील:**

| शैक्षणिक वर्ष | लाभार्थी विद्यार्थी संख्या | वितरीत रक्कम | अभिप्राय |
|---|---|---|---|
| २०१७-१८ | १५४५०९ | रु. ४९७.७३ कोटी. | वाटप पूर्ण |
| २०१८-१९ | १६९१२६ | रु. २११.३४ कोटी | पहिला हप्ता वाटप पूर्ण, उर्वरित वाटप प्रक्रिया सरू आहे. |

## ➢ डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना :-

उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासनामार्फत मान्यता प्राप्त निवडक व्यावसायिक अभ्यासक्रमात शासनाच्या सक्षम प्राधिकरणामार्फत केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेव्दारे (CAP) प्रवेश घेतलेल्या राज्यातील पात्र विद्यार्थ्यांना वसतिगृह निर्वाह भत्ता खालील प्रमाणे अनुज्ञेय आहे.

| अ. क्र. | प्रकार | प्रवेशित अभ्यासक्रमाच्या संस्थेचे ठिकाण | वार्षिक वसहतीगृह निर्वाह भत्याची एकुण रक्कम (शैक्षणिक वर्षातील १० महीन्या करिता) | राज्याच्या प्रत्येक जिल्हयासाठीचा संच (Quota) |
|---|---|---|---|---|
| १ | ज्या विद्यार्थ्यांचे पालक अल्पभूधारक शेतकरी किंवा नोंदणीकृत मजूर आहेत. | (मुंबई व पुणे महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण क्षेत्रातील सर्व शहरे, औरंगाबाद, नागपूर) | रु. ३०,०००/- | सर्व पात्र विद्यार्थी |
| | | राज्यातील अन्य ठिकाणी | रु. २०,०००/- | |
| २ | आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी (कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न मर्यादा - **१ लाख पर्यंत**) | (मुंबई व पुणे महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण क्षेत्रातील सर्व शहरे, औरंगाबाद, नागपूर) | रु. १०,०००/- | सर्व पात्र विद्यार्थी |
| | | राज्यातील अन्य ठिकाणी | रु. ८,०००/- | |
| ३ | आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी (कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न मर्यादा - **१ लाखापुढे ते ८ लाख पर्यंत**) | (मुंबई व पुणे महानगर प्रादेशिक क्षेत्रातील सर्व शहरे, औरंगाबाद, नागपूर) | रु. १०,०००/- | ५०० पर्यंत मर्यादित संच (३३ टक्के महीलांकरिता राखीव व अभ्यासक्रम निहाय गुणवत्ते नुसार) |
| | | राज्यातील अन्य ठिकाणी | रु. ८,०००/- | |

**मागील वर्षातील लाभार्थी विद्यार्थ्यांचा तपशील:**

| शैक्षणिक वर्ष | लाभार्थी विद्यार्थी संख्या | वितरीत रक्कम | अभिप्राय |
|---|---|---|---|
| २०१७-१८ | २१९९७ | रु. ४९.०२ कोटी. | वाटप पूर्ण |
| २०१८-१९ | ४११६२ | रु. ९९ कोटी अर्थसंकल्पीय रकमेची वितरणाची प्रक्रिया सुरु आहे. | |